## मराठी अर्थशास्त्र परिषद

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास ₹ ११०००/- व प्रमाणपत्र देण्यात येते. १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिकेस ( मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे **३० सप्टेंबर २०२६** पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. १३,१४ व १५ नोव्हेबर २०२६ रोजी बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

- डॉ. मारोती तेगमपुरे, कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास ₹ १०००/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांस (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे **३० सप्टेंबर २०२६** पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. १३,१४ व १५ नोव्हेबर २०२६ रोजी बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

- डॉ. मारोती तेगमपुरे कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार ₹ १०००/- चा व द्वितीय पुरस्कार ₹ ५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील.

एक सदस्य जास्तीत जास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून **३० सप्टेंबर २०२६** पूर्वी कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावेत. १३,१४ व १५ नोव्हेबर २०२६ रोजी बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

- **डॉ. मारोती तेगमपुरे,** कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

## शोधनिबंध पाठविण्यासंबधी सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४९ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन १३,१४ व १५ नोव्हेबर २०२६ रोजी बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली येथे होत आहे. शोधनिबंधासाठीची शब्दमर्यादा २००० व सोबत ३०० ते ४०० शब्दांत गोषवारा **अत्यावश्यक** आहे. शोधनिबंध मराठीतच असणे आवश्यक असून यापूर्वी तो इतरत्र प्रकाशित झालेला नसावा. शोधनिंबंधावर आपला आजीव सदस्य क्रमां (सह-लेखक असेल तर त्यांचाही आजीव सदस्य क्रमांक), भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, महाविद्यालयाचे नाव व पत्ता इत्यादी तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. शोधनिबंध (वर्ड फाईल व पीडीएफ) maparishad1977@gmail.com याठिकाणी मेल करावा. शोधनिबंध **३० सप्टेंबर २०२६** रोजी पर्यंत मा. अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद यांना पोहचतील या बेताने पाठवावेत.

### शोधनिबंधासाठी विषय

१. व्यापार चक्राची सैद्धांतिक चिकित्सा.
२. निति आयोगाच्या परिप्रेक्ष्यातील भारताच्या आर्थिक धोरणांची मीमांसा.
३. पर्यावरणीय बदल व महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.

### पत्रव्यवहारासाठी पत्ता

**प्राचार्य (डॉ.) रामेश्वर भिसे**
ए ८, "आनंद" श्रीहरी नगर, जठार पेठ,
अकोला ४४४००५ भ्र. ९९७०१५१३४८
ई-मेल maparishad1977@gmail.com

- डॉ. मारोती तेगमपुरे कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

**Announcement for Call of Articles**
**Dr. Ravindra Sabnis Memorial Prize.**

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand Only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2025 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 30 September 2026, For further details, contact the undersigned at this address.

**Prin. (Dr.) Vikas Vinayakrao Sukaale**
03, Aaryvihaar Apartment,
Tilak Nagar, Vidhyut Nagar Stop,
Shahu Nagrar Side, Nanded. 431602
Cell. 9423345145

४९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, विटा निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करु नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये कारण ते सर्वांना माहित असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या "अर्थशास्त्र परिभाषा कोश" आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरीत नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दात गोषवारा द्यावा. (गोषवारा अनिवार्य)

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**४९ वे राष्ट्रीय अधिवेशन, विटा: शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४९ वे वार्षिक अधिवेशन बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली येथे दिनांक १३,१४ व १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान अकोला येथील **प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे** हे भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष **प्राचार्य डॉ.चंद्रकांत बोबडे** आणि स्थानिक-कार्यवाह **डॉ. प्रवीण बाबर** (९०७५९७९००९, ९४०३४६८९५७) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१. व्यापार चक्राची सैद्धांतिक चिकित्सा.
२. निती आयोगाच्या परिप्रेक्ष्यातील भारताच्या आर्थिक धोरणांची मीमांसा.
३. पर्यावरणीय बदल व महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.

वरील तीन विषयाचे शोधनिबंध आपणास मा.अध्यक्षांकडे पाठवता येतील. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत. ३० सप्टेंबर २०२६ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दात मांडावयाचे असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध युनिकोड या फॉन्टमध्ये PageMaker या सॉफ्टवेरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ १४ असावी. निबंधाची सॉफ्ट कॉपी व दोन हार्ड कॉपीज मा.अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सभासद असावा (सह-लेखक असेल तर आजीव सभासद असणे बंधनकारक), निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय / विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**प्राचार्य (डॉ.) रामेश्वर भिसे**
ए ८, "आनंद" श्रीहरी नगर, जठार पेठ,
अकोला ४४४००५ भ्र. ९९७०१५१३४८
ई-मेल maparishad1977@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे,**
**कार्यवाह खजिनदार,**
**मराठी अर्थशास्त्र परिषद,**
**९४२३९९३१३७**